बातमीपत्र

**पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दि १३ ऑक्टोबर २०२३**

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ६७५/२०२३ भादवि ४७१,४२०,४६५,४६७,४६८,४७१,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०३/०७/२०२३ रोजी सह दुय्यम निबंधक वर्ग-२ सोलापूर उत्तर २ यांचे कार्यालय सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १२/१०/२०२३ रोजी १३.४१ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | दत्तात्रय गुलाब मोरे,वय-६२ वर्षे,रा- १३९,गणेश नगर मडकी वस्ती नागोबा मंदिर मागे पुना रोड सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) मारूती रत्नप्पा पवार रा- मुपो बीबी दारफळ ता.उत्तर सोलापूर,२) अशोक गुलाब मोरे,३) श्रीकांत नागनाथ मोरे,४) सुनिल दत्तात्रय गायकवाड,रा- जुना विडी घरकुल सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी व फिर्यादीचा मुलगा विकास यांनी तलाठी कार्यालयातून शेतजमीनीचा ७/१२ व तहसील कार्यालयातून फेरफार काढले होते तेव्हा त्यांना खरेदी दस्त क्र २१९३/२००३ बीबी दारफळ येथील फिर्यादी व फिर्यादीचा भाऊ शहाजी व अशोक यांचे मालकीची शेतजमीन गट नं ५७३/२ क्षेत्र २ हेक्टर ७० आर ही आरोपी क्र १ याने फिर्यादी,फिर्यादीचा मुलगा व बेपत्ता झालेला भाऊ शहाजी मोरे यांचे ऐवजी दोन तोतया इसमाना उभा करून व आरोपी क्र १ यांने फिर्यादीचा भाऊ अशोक मोरे यांचेशी संगनमत करून दि ०३/०७/२००३ रोजी नमुद ठिकाणी कार्यालयात खोटा व बनावट खरेदीखत करून स्वत:चे नावे करून घेतली आहे.खरेदीवेही फिर्यादी ऐवजी दुसरे दोन तोतया इसम असल्याचे दिसत आहे तसेच भाऊ आरोपी क्र २ अशोक हा दस्त करतेवेळी हजर असल्याचे दिसत आहे तसेच साक्षीदार म्हणून आरोपी क्र ३ व ४ यांनी सहया केलेल्या आहेत आरोपी क्र १ याने सदर खरेदीदस्ताचे आधारे इतर व्यक्तींना सदर शेतजमीन विकलेली आहे.तपास:- पोसई- लोंढे - **९०२१५२६१३५** |

## एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ७२६/२०२३ भादवि ३९२ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १२/१०/२०२३ रोजी १६.०० वा चे सुमारास यशोधरा हॉस्पीटल ते रंगराज नगर कडे असलेल्या वळणाजवळ सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १२/१०/२०२३ रोजी २३.०२ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | अंबिका रविंद्र आब्बातीनी,वय-२५ वर्षे,रा-सी/१११८/सी ग्रुप सागर चौक जवळ जुना विडी घरकुल सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अनोळखी चोरटा |
| **गेला माल** | | ६७,५००/- रू चे त्यात २२.५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठण |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, दि १२/१०/२०२३ रोजी १६.०० वा चे सुमारास यशोधरा हॉस्पीटल ते रंगराज नगर कडे असलेल्या वळणाजवळून माप देण्यासाठी हातात पिशवी घेवून पायी जात असताना अचानकपणे पाठीमागून फिर्यादीचे गळयातील गंठण जोराने खेचले गेले फिर्यादीने गंठण हाताने धरत मागे वळून पाहिले असता त्या अनोळखी चोरटयाने तोंडावर पांढरा रूमाल बांधलेला अंगाने जाड असलेला कमी कमी उंचीचा पांढरा टी शर्ट घातलेला अंदाजे २० ते २२ वर्षाचा मुलगा होता त्याने जोरात ओढून गंठण तोडून घेवून पळून गेला आहे त्यावेळी फिर्यादीने ओरडले असता फिर्यादीचे वहिणी राणी आबात्तीने हे देखील माप देण्यासाठी चालली होती |

| | | |
|---|---|---|
| | | तिने चोराचा पाठलाग केले परंतु तो काटेरी झुडुपातून पळून गेला आहे तरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे सोन्याचे गंठण जबरदस्तीने हिसका मारून चोरून नेले आहे.तपास:- पोसई-रजपूत- **९९२२६११२२२** |

## जेलरोड पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३९३/२०२३ भादवि १८८,२७२,२७३,३२८,अन्न सुरक्षा व मा.का.क २६(२)(i),२६(२)(ii)२६(२)(iv),२७(३)(e),३०(२)(a) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १२/१०/२०२३ रोजी १५.०० वा चे सुमारास शांती चौक ते अशोक चौकाकडे जाणारे रोडवर सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १२/१०/२०२३ रोजी २३.४० वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | रेणुका रमेश पाटील,वय-३८ वर्षे,नेम-स.आयुक्त यांचे कार्यालय अ.व औषध प्रशासन मा.राज्य प्रशासकीय |
| **आरोपीचे नाव** | : | सलीम मौलाली करणकोट,वय-४३वर्षे,रा-एल.आय.जी प्लॉट नं ३७ सागर चौक जुना विडी घरकुल सोलापूर |
| **मिळाला माल** | | १,४९,०२०/- रू चे त्यात एक ॲटोरिक्षा पानमसाला सुंगधी तंबाखु विनालेबल पानमसाला असे एकूण |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, दि १२/१०/२०२३ रोजी १५.०० वा चे सुमारास शांती चौक ते अशोक चौकाकडे जाणारे रोडवर यातील नमुद आरोपी मजकूर यांने त्यांच्या मालकीचे ॲटोरिक्षा क्र एमएच १३ बीवी १९५४ मधून प्रतिबंधीत अन्न पदार्थाचा स्वत:च्या आर्थिक फायदयासाठी विक्रीहेतू वाहतूक करून मा.शासनाच्या वतीने मा.अन्न सुरक्षा आयुक्त अन्न व औषध प्रशासन मुंबई यांनी अधिसुचना क्र असुमाअ/अधिसुचना-४९६/७ दि १८ जुलै २०२३ नुसार जारी केलेल्या प्रतिबंधीत पानमसाला व सुगंधी तंबाखू इत्यादी तत्सम अन्न पदार्थाचा विक्री हेतू मा.राज्यातून उत्पादन वाहतुक साठा विक्री बंदी आदेशाचे भंग केले आहे तसेच पानमसाला सुंगधी तंबाखु ची विक्री करण्याच्या उद्देशाने वाहतूक करून नमुद कलमाचा भंग केला आहे तसेच लोकसेवकांना त्याना दिलेल्या अधिकारानुसार जनहित व जन आरोग्याच्या दृष्टीकोनातुन काढलेल्या आदेशाची अवज्ञा केले आहे तसेच सदरील प्रतिबंधीत अन्न पदार्थाचे पुरवठादार कोण आहे सदरचा माल कोठून विकत आणला याबाबत चौकशी करण्याकरीता फिर्यादी दाखल आहे.तपास:- पोसई-बादोले- **९८२३४९९५५६** |